**जळगाव जिल्ह्यातील भुसावळ, रावेर, यावल, चोपडा, अमळनेर, धरणगाव, एरंडोल, पारोळा व जळगाव तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या वाळू घाटांकरिता (एकूण ४३) दि. १८/५/२०२० रोजी झालेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त**

जळगाव जिल्ह्यातील खालील तक्त्यात नमूद केलेल्या भुसावळ, रावेर, यावल, चोपडा, अमळनेर, धरणगाव, एरंडोल, पारोळा व जळगाव तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या वाळू घाटांकरिता (एकूण ४३) पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दि. १८/५/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव येथून व्हिडिओ कॉन्फरसिंग द्वारे घेण्यात आली.

| अ. क्र. | प्रस्तावित वाळू घाटाची ठिकाणे | तालुका |
|---|---|---|
| १ | जोगलखेडा, भानखेडा, गोम्भी, सुनसगाव, बेलव्हाय भाग-१, बेलव्हाय भाग-२ व बेलव्हाय भाग-३ | भुसावळ |
| २ | वडगाव, आंदलवाडी, निंभोरा (बु), केऱ्हाळे (बु), धुरखेडा, पातोंडी, दोंधे व बलवाडी | रावेर |
| ३ | थोरगव्हाण व पिंपरी | यावल |
| ४ | पिंपरी, घाडवेल, कोळंबा व सुटकार | चोपडा |
| ५ | धावडे, रुंधाटी भाग-१, रुंधाटी भाग-२, सावखेडा, हिंगोणेसीम प्र. ज. भाग-१ व हिंगोणेसीम प्र. ज. भाग-२ | अमळनेर |
| ६ | बांभोरी प्र. चा., आव्हाणी, नारणे व बाभुळगाव | धरणगाव |
| ७ | टाकरखेडा, वैजनाथ व उत्राण | एरंडोल |
| ८ | बहादपूर, महालपूर व उंदीरखेडे | पारोळा |
| ९ | भोकर व पळसोद | जळगाव |

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्र. BO/JD (WPC)/PH/B-२००५१८-FTS-००३१ दि. १८/५/२०२० अन्वये सदरच्या लोकसुनावणीसाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

१) जिल्हादंडाधिकारी, जळगांव किंवा त्यांचे प्रतिनिधी (अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - अध्यक्ष

२) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक - सदस्य

३) उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव - समन्वयक

सदरच्या पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीसाठी खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१) श्री. रविंद्र भारदे
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, जळगांव

२) श्री. अमर दुर्गुले,
प्रादेशिक अधिकारी
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक- (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे)

३) श्री. सो. म. कुरमुडे
उप-प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव

श्री. सो. म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सदरच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष, तसेच व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक, महसूल विभागाचे अधिकारी व जळगांव जिल्हयातील व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित नागरिकांचे स्वागत केले. तसेच समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी सुरु करण्यात आली.

सर्वप्रथम समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सुचित केले की, भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि.१४/०९/२००६ व सुधारीत दि.०१/१२/२००९ रोजीच्या अधिसुचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक संमती घेणे बंधनकारक असून त्यापूर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

जळगांव जिल्हयातील ४३ वाळू घाटांमधून वाळूचा उपसा करण्याकरीता प्रकल्प प्रर्वतक अप्पर जिल्हाधिकारी, जळगांव यांनी दि.०९/०३/२०२० रोजी रितसर शुल्क भरुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबत अर्ज केला होता.

समन्वयक यांनी नमूद केले की, केंद्र शासनाच्या खनिजकर्म विभागाने मार्च २०१८ मध्ये Sand Mining Frame Work, 2018 प्रसिध्द केलेले आहे. त्यामध्ये वाळू/रेती निर्गती करताना आवश्यक असणाऱ्या बाबीं संदर्भात देशातील काही ठळक राज्यांचा अभ्यास करुन काही दिशा निर्देशक दिलेले आहेत. तसेच माननीय राष्ट्रीय हरित लवादाने (एनजीटी) यांनी ओ.ए.नंब. ३६८/२०१५ मध्ये दिनांक १९/०९/२०१८ रोजीच्या आदेशानुसार केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याशी समन्वय साधून Sustainable Sand Mining Guidelines, 2016 व Sand Mining Frame Work , 2018 व २०२० नुसार धोरणात अनुकूल बदल करण्याचे व जनसुनावणी घेण्याचे निर्देश पारित केलेले आहेत.

समन्वयक यांनी असे नमूद केले की, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचा मुळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणाऱ्या परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण संयत्रणा व त्या अनुषंगाने कायदे याबाबतची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सुचनांचा विचार करणे.

मप्रनि मंडळाकडे प्राप्त लोकसुनावणी घेण्याबाबतच्या अर्जाच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, जळगांव यांच्या परवानगीने दि.२१/०४/२०२०, दि.२२/०४/२०२० व दि.२३/०४/२०२० रोजी जळगांव जिल्हयातील वाळू घाटांबाबत पर्यावरण विषयक लोकसुनावणी घेण्याबाबत दिनांक निश्चित करण्यात आल्या होत्या. याबाबत नियमाप्रमाणे ३० दिवस अगोदर दि.१९/०३/२०२० रोजीच्या मराठी दैनिक लोकमत व इग्रजी दैनिक द टाइम्स ऑफ इंडिया मध्ये सदरच्या लोकसुनावणीबाबतच्या सुचना प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. तसेच अधिसुचनेप्रमाणे वाळू घाटासंबंधीचे ठळक वैशिष्ट असलेल्या व प्रकल्पाबाबत माहिती असलेल्या प्रारुप पर्यावरण व्यवस्थापन अहवालाच्या प्रती मराठी व इंग्रजीत शासनाच्या खालील कार्यालयामध्ये इच्छिुक नागरिकांना अभ्यास करण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या.

१) जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव.
२) जिल्हा उद्योग केंद्र, जळगांव.
३) जिल्हा परिषद कार्यालय, जळगांव.
४) महानगरपालिका जळगांव व नगरपरिषद, भुसावळ, यावल, रावेर, अमळनेर, चोपडा, धरणगांव, एरंडोल व पारोळा.
५) तहसिल कार्यालय, जळगांव, भुसावळ, यावल, रावेर, अमळनेर, चोपडा, धरणगांव, एरंडोल व पारोळा.
६) उप-विभागीय कार्यालय, जळगांव, भुसावळ, फैजपूर, अमळनेर व एंरडोल, .
७) ग्रामपंचायत कार्यालय
    (१) जोगलखेडा, भानखेडा, गोंभी, सुनसगांव व बेलव्हाय, ता. भुसावळ, जि. जळगांव.
    (२) वडगांव, आंदलवाडी, निंभोरा बु., केऱ्हाळे बु., धुरखेडा, पातोंडी, दोधे व बलवाडी, ता. रावेर, जि. जळगांव.
    (३) थोरगव्हाण व पिंप्री, ता. यावल, जि. जळगांव.
    (४) पिंप्री, घाडवेल, कोळंबा व सुटकार, ता. चोपडा, जि. जळगांव.
    (५) धावडे, रुंधाटी-१, रुंधाटी-२, सावखेडा, हिंगोणेसिम प्र. ज. भाग-१ व हिंगोणेसिकम प्र. ज. भाग-२, ता. अमळनेर, जि. जळगांव.
    (६) बांभोरी प्र. चा., आव्हाणी, नारणे व बाभुळगांव, ता. धरणगांव, जि. जळगांव.
    (७) टाकरखेडा, वैजनाथ व उत्राण, ता. एरंडोल, जि. जळगांव.
    (८) बहादपूर, महालपूर व उंदीरखेडे, ता. पारोळा, जि. जळगांव.
    (९) भोकर व पळसोद, ता. जि. जळगांव.
८) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला मजला, त्रबंक रोड, आयटीआय जवळ, सातपूर, नाशिक-४२२००७.
९) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईंट, ३ रा मजला, सायन (पूर्व), मुंबई-४०००२२.
१०) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, १५ मजला, मादाम कामा रोड, मुंबई.
११) पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय, तळ मजला, इस्ट विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाइन्स, नागपूर-४४०००१.

परंतु कोरोना व्हायरसच्या प्रार्दुभावामुळे शासनाने लॉकडाऊन घोषित केल्याने सदरच्या जाहीर सुनावण्या मा. जिल्हाधिकारी, जळगांव यांच्या मान्यतेने पुढे ढकलण्यात आल्या होत्या. याबाबतची रितसर जाहीर सुचना दि.१८/०४/२०२० रोजी दै. लोकमत व द टाईम्स ऑफ इंडिया यामध्ये प्रकाशित करण्यात आली होती.

तद्नंतर वैज्ञानिक, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन तथा सचिव, राज्यस्तरीय तज्ज्ञ मूल्यांकन समिती-१ यांनी त्यांच्या पत्र क्र. SEAC/२०१६/प्र. क्र. १/ तां. क. ३ दि. ४/५/२०२० अन्वये सध्या सुरु असलेल्या कोविड-१९ विषाणूच्या उद्रेकामुळे राज्यात शासनातर्फे करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे सदरील जाहीर लोकसुनावणी ह्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे घेण्याबाबत सूचित केले होते. त्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, जळगाव यांच्या परवानगीने दि.१८/०५/२०२० रोजी सकाळी ११:०० वाजता जिल्ह्यातील उपरोक्त ४३ वाळू घाटांकरिता पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी दि. १८/५/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे घेण्यात आली. याबाबतची जाहीर सुचना दि.०८/०५/२०२० रोजी दै. लोकमत व द टाईम्स ऑफ इंडिया यामध्ये प्रकाशित करण्यात आली होती.

तद्नंतर जळगांव जिल्हयातील ४३ वाळू घाटांबाबत श्री. दिपक चव्हाण, जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी सविस्तर अहवाल सादर केला. तसेच वाळू उपसा करतांना प्रदूषण नियंत्रण करतांना घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत माहिती दिली.

सादरीकरणांनतर समन्वयक यांनी लोकसुनावणीसाठी उपस्थित नागरिकांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे या वाळू घाटांबाबत त्यांचे मत, टिका-टिप्पणी, आक्षेप, सुचना मांडण्याबाबत आवाहन केले. तसेच यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे ईमेलव्दारे दोन लेखी निवेदने प्राप्त झाल्याबाबत कळविले. उपस्थितांनी नोंदविलेली मते व त्याबाबतचा अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव व नोंदविलेले मत | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | **श्री. अमर दुर्गुले, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक** - वाळू उपसा करण्याबाबतची प्रमाण व वेळ याबाबत माहिती विचारली. | **श्री. दिपक चव्हाण, जिल्हा खनिकर्म अधिकारी** - वाळू उपसाचे प्रमाण अतांत्रिक पध्दतीने सकाळी ६ ते सायकांळी ६ वाजेपर्यंत करण्यात येणार आहे. |
| २ | **श्री. चंद्रकांत चौधरी, भुसावळ** - वाळू उपसा बद्दल लेखी निवेदन ई-मेल वर पाठविले आहे. सदरील लोकसुनावणी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ऐवजी लॉक डाऊन संपल्यानंतर प्रत्यक्ष घेण्यात यावी. ग्रामीण लोक हे टेक्नॉलॉजी पासून दूर आहेत. या सुनावणीचे दुष्परिणाम होतील.<br>सुनसगाव, गोम्भी या गावातून वाळू सोबत नदीलगत असलेल्या मातीचा सुद्धा अवैधरित्या उपसा केला जात आहे. वाळू उपश्या मुळे मासेमारी व शेती धोक्यात आली आहे. नदीच्या पाण्यात नायट्रेट व फॉस्फेटचे प्रमाण वाढले आहे. वाळू उपश्यावर कुणाचेही नियंत्रण नाही. नदीपात्र खोल गेले आहे. साथीच्या रोगाचा प्रसार होतो आहे. | **श्री. सो. म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ** - वैज्ञानिक, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन तथा सचिव, राज्यस्तरीय तज्ज्ञ मूल्यांकन समिती-१ यांनी त्यांच्या पत्र क्र. SEAC/२०१६/प्र. क्र. १/ तां. क. ३ दि. ४/५/२०२० अन्वये व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे घेण्यात येत आहे.<br>**श्री. दिपक चव्हाण, जिल्हा खनिकर्म अधिकारी** - वाळू उपसा करत असताना कंत्राटदारास प्रदूषण होणार नाही याबाबत खबरदारी घेणे व सर्व नियमांचे पालन करणे बंधनकारक असेल. |
| ३ | **श्री. सागर मोरे, पातोंडे, ता. अमळनेर** - वाळू उपसा अवैधरित्या सुरु असून वाळू उपसा करण्यात येत असलेल्या ठिकाणी सी. सी. टी. व्ही. कॅमेरे बसविण्यात यावेत जेणे करून अवैध वाळू उपसा रोखला जाऊ शकेल. तसेच याबाबत तक्रार नोंदविण्याकरिता टोल फ्री क्रमांक सुरु करण्यात यावा. वाळू वाहतूक जिल्ह्यांतर्गतच होईल की जिल्ह्याबाहेर सुद्धा होईल. वाळू उपसा करत असताना ध्वनी प्रदूषण होईल. वाळू वाहतूक करताना बऱ्याच वेळेस दुर्घटना होतात. याबाबत आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात. | **श्री. दिपक चव्हाण, जिल्हा खनिकर्म अधिकारी** - महसूल व वन विभाग यांच्याकडील सुधारित वाळू निर्गती धोरण दि. ३-९-२०१९ मधील तरतुदींनुसार महसूल व वन विभाग यांच्याकडील सुधारित वाळू निर्गती धोरण दि. ३-९-२०१९ मधील तरतुदींनुसार वाळूच्या अवैधरित्या उत्खननावरउपाययोजना करण्यासाठी संबंधित उप-विभागीय अधिकारी व तहसीलदार यांना कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात येईल. वाळू उपसा करत असताना कंत्राटदारास  ध्वनी प्रदूषण होणार नाही याबाबत खबरदारी घेणे, वाहनांची नियमितपणे दुरुस्ती करणे इत्यादी बाबी बंधनकारक असतील. तसेच वाळू घाटांची लिलाव प्रक्रिया शासकीय नियमांनुसारच होईल. तसेच सी. सी. टी. व्ही. कॅमेरे बसविण्यात व तक्रार नोंदविण्याकरिता टोल फ्री क्रमांक सुरु करण्याबाबतची नोंद घेण्यात आली आहे. |
| ४ | **श्री. दिगंबर चौधरी (सरपंच, निंभोरा, ता. रावेर)**- नदीपात्रातून वाळूची वाहतूक मोठ्या प्रमाणात होते व त्यामुळे गावचे रस्ते खराब होतात. वाळू विक्रीतून | **श्री. दिपक चव्हाण, जिल्हा खनिकर्म अधिकारी** - वाळू घाटांची लिलाव प्रक्रिया शासकीय नियमांनुसारच केली जाईल. |

| | | |
|---|---|---|
| | मिळणारा ५० % निधी ग्रामपंचायतीस देण्यात यावा जेणे करून विविध विकासकामे केली जाऊ शकतील. | |
| ५ | **श्री. सदाशिव पाटील (सरपंच, आव्हाणी, ता. धरणगाव)** - वाळू उपसा करण्यासाठीची नियोजित वेळ काय असेल? | **श्री. दिपक चव्हाण, जिल्हा खनिकर्म अधिकारी** - वाळू उपसा हा सकाळी ६ ते संध्याकाळी ६ या वेळेमध्येच केला जाईल. |
| ६ | **श्री. राजेंद्र वाघोदे (सरपंच, वडगाव, ता. रावेर)** - गावामध्ये जाण्या येण्याकरिता रस्ता नाही आहे. वाळू लिलावातून मिळणाऱ्या निधीतून रस्ता बनवून देण्यात यावा. वाळूच्या ट्रॅक्टर मुळे वाहतुकीस मोठ्या प्रमाणावर अडथळा होतो. वाळू घाटांचा लिलाव कधी होणार? वाळूचे दर किती आहेत? | **श्री. दिपक चव्हाण, जिल्हा खनिकर्म अधिकारी** - कंत्राटदारास वाहतुकीस अडथळा होणार नाही अश्या पध्दतीने काम करण्याच्या अटींवर परवानगी दिली जाईल. शासन निर्णयानुसार वाळूचा किमान दर ४०७१ रु. प्रति ब्रास इतका निश्चित करण्यात आला आहे. सर्व वाळू घाटांचा लिलाव नियमानुसार सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर घेण्यात येईल. |
| ७ | **श्री. युवराज कुलकर्णी** - स्थानिक रहिवाशांना वाळूविक्रीचा हक्क मिळावा तसेच ग्रामपंचायतीस सहायता निधी मिळावा. | **श्री. दिपक चव्हाण, जिल्हा खनिकर्म अधिकारी** - महसूल व वन विभाग यांच्याकडील सुधारित वाळू निर्गती धोरण दि. ३-९-२०१९ मधील तरतुदींनुसार संबंधित ग्रामपंचचायतींना विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल. |
| ८ | **श्री. चंद्रकांत दिलीप पवार (अमळनेर)** - ठेकेदार नियम पाळत नाहीत. वाळू उपसा व वाहतूक नियमांनुसार केली जावी | **श्री. दिपक चव्हाण, जिल्हा खनिकर्म अधिकारी** - लिलावधारकाला नियमानुसार वाळूचा उपसा व वाहतूक करण्याबाबत वेळोवेळी समज देण्यात येईल. |

श्री. सो. म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ व श्री. दिपक चव्हाण, जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी सर्व सहभागी नागरिकांना आवाहन केले की अजून कुणास आपले मत मांडावयाचे असल्यास ते मांडू शकतात. त्यानंतर कुणीही आपले म्हणणे मांडावयास पुढे आले नाही.

श्री. सो. म. कुरमुडे यांनी नागरिकांनी मांडलेल्या सर्व मुद्द्याची नोंद घेण्यात आली असल्याचे सांगितले. त्यानंतर मा. अध्यक्ष्यांच्या परवानगीने त्यांनी सर्वांचे आभार मानून जाहीर लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| (सो. म. कुरमुडे)<br>समन्वयक<br>तथा<br>उप-प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>जळगांव | (अमर दुर्गुळे)<br>सदस्य<br>तथा<br>प्रादेशिक अधिकारी<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>नाशिक | (रविंद्र भारदे)<br>अध्यक्ष<br>तथा<br>अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी,<br>जळगांव |